# माझी महापूजा

माझ्या पूजेत एकच देव नाही कारण मी करतेय ४०० देवांची पूजा, माझ्या पूजेच्या तबकात हळद, कुंकू, अक्षता, दुर्वा उदबत्ती, प्रसाद असं काही सुध्दा नाही, पण हो तरी सुध्दा माझी पूजा सुरु आहे. कारण माझ्या पूजेच्या तबकात आहे आत्मविश्वास, प्रोत्साहन, अभ्यासात निर्माण झालेली गोडी, निरागस चेहऱ्यावरचं हसू, अभ्यासाच्या दप्तराच्या ओझ्यातून मुक्त झाल्यामुळे स्वच्छंद बागडणारं बालपण. बालपण म्हणजे मनसोक्त खेळणं मग माझी पूजा का नाही करुन देणार मला माझ्या देवाची प्राप्ती ?

कारण माझं एक मनोरथच आहे, मी माझ्या देवांना नवस बोलले होते की ह्या सर्व मुलांना मी त्याचं बालपण परत मिळवून देईल, तेव्हाच माझी पूजा संपन्न होईल.

वर्गात मुलांच्या अंगावर शिक्षिका ओरडल्या की माझं मन दुखतं, त्यांना मी म्हणजे, "नका ग, अशा या निरागस बालकांवर ओरडू, त्यांच चुकत असेल पण तुम्ही त्यांच्याशी हळूवारपणे बोला. बघा ऐकतील ते."

"त्यांच्या त्या कोमल नाजूक छोट्या बोटांना नका सांगु भारंभार प्रश्नोत्तरे लिहायला. आधी पाठ करुन घ्या व मगच सांगा लिहायला, त्याच्या छोट्याशा पाठीवर नका लादू दप्तरांचे ओझे, आपण वह्या, व्यवसायपुस्तिका ऐवजी वापरु सुटे कागद.

नका पाठवू या बालकांना ट्यूशन्सला शाळेतच सर्व अभ्यासाचा फडशा पाडू. मग बघा पालकांना त्यांना खेळण्यासाठी पाठवावेच लागेल."

माझे सर्व ४०० देव आज खुशीत आहे.

आज महाशिवरात्र आहे. लोक आज महादेवाला अभिषेक घालतात. पण माझ्या महाशिवरात्रीत आहेत ३६५ दिवस ! दर दिवशी माझा अभिषेक सुरु आहे. महादेवावर थेंब-थेंब दुधाचा अभिषेक अहोरात्र सुरु असतो. तसाच अभिषेक दर दिवशी मी करतेय ४०० देवांवर.

काही विद्यार्थी असे असतात ते ५ वी / ६ वी त स्पिक ॲण्ड स्पॅन मध्ये प्रवेश घेतात. त्यांचा पाया अगदी कच्चा असतो. त्यांना त्यांच्या गतीनेच म्हणजेच थेंबा- थेंबाच्या गतीने पण अगदी नियमबध्दतेने थोडे-थोडे त्यांना झेपेल अशा तऱ्हेने पण अव्याहतपणे अभ्यासाचा कार्यक्रम आखावा लागतो. तेव्हा मला खरोखर आठवण येते ती महादेवावरच्या अभिषेकाची. मला माझ्याच मनाला कठोर अशा नियमिततेच्या साच्यातून जाताना चाचपणी करावी लागते. "बघं हं, झेपेल न हे, साधेल का त्यांना ?" विद्यार्थ्यांचा वेळ तर वाया जाता कामा नये. पण अधीर होऊनही चालणार नाही. असं करता करता ६-८ महिन्यांमध्ये त्यांची गाडी रुळावर येऊ लागते, शाळेच्या चाटा कमी होतात व अभ्यासाची गोडी निर्माण होताना दिसते. तेव्हा त्या विद्यार्थ्यांपुरता तरी अभिषेक संपन्न झाल्यासारखे मला समाधान लाभते. खरंच, महादेवाच्या अभिषेकाने मला सातत्य, नियमितपणा, चिकाटींच महत्व सांगितलं, तेव्हा खरचं असं वाटतं हे देवांच्या देवा महादेवा माझ्या हातून अशा या विद्यार्थ्यांच्या बाबतीत अनेक अभिषेक घडू दे ! व माझ्या या साधनेतून मला पैलतीर गाठू दे.

मी आहे विपश्यनेची साधक, पण विपश्यना हा एक ज्ञानमार्ग आहे. या ज्ञानमार्गावरुन वाटचाल करता करता मी भक्तिमार्गाकडे कधी आकर्षिक झाले ते माझं मलाच कळलं नाही, की ज्ञानमार्ग व भक्तीमार्ग असे वेगवेगळे करताच येत नाही कारण विपश्यनेच्या ज्ञानमार्गावरच माझी भक्ती जडलीय.

महादेवाला प्रिय आहे तो बेल, ती तीन पानं शील, समाधी व प्रज्ञेचीच मानता येतील का ? शील पालनासाठी स्पिक ॲण्ड स्पॅनच्या अभ्यासक्रमातच मनावर विजय मिळविण्यासाठी "आनापान" ध्यान साधनेचा समावेश केला आहे. या ध्यानामुळे स्वैर सुटलेल्या मनाला आवर घालणे विद्यार्थ्याला साधते व ते खोटे न बोलणे, चोरी न करणे, यासारखे छोटे-छोटे का होईना, शील पाळण्याचे नियम विद्यार्थी शिकतात, ते पण शास्त्रशुध्द पध्दतीने, कारण आनापान म्हणजे येणाऱ्या व जाणाऱ्या श्वासावर लक्ष केंद्रित करणे. जसे तुम्ही श्वासावर लक्ष केंद्रित करता तशी विद्यार्थ्यांची चंचलता कमी होते, ते स्थिर

होतात. त्यांच्यात जाणवतो तो शहाणपणा व सूज्ञपणाचा प्रभाव.

महादेवाला प्रिय आहे पांढर फूल शाळेचं नाव आहे ''स्पिक ॲण्ड स्पॅन'', लोक विचारतात म्हणजे काय ? मी त्यांना सांगते, ''पांढऱ्या रंगावर छोटासा सुध्दा डाग चालत नाही. अगदी तसंच विद्यार्थ्यांच चारित्र्य डागविरहीत स्वच्छ असावं अशीच माझी मनोकामना आहे. म्हणून मी भक्तीभावानं शाळेचं नाव ठेवलं. म्हणजे ''स्पॉटलेस क्लिन''.''

जसे जसे विद्यार्थी सातत्याने तासभर अभ्यास करायला शिकतात, खरंच सांगते मला अपेक्षित असलेली समाधी विद्यार्थ्यांना साधता आली अशीच माझी मनोधारणा मला सांगते.

कितीही नाही म्हटलं तरी अगदी लहानपणापासून देवाला हात जोडून काहीतरी मागणी करणे हेच शिकले मी, म्हणून आज सुध्दा माझ्या देवांना मी काहीतरी मागणारच आहे. बेलाच्या पहिल्या दोन पानांप्रमाणे शील, समाधी तर तुम्ही शिकलात. आता राहिली प्रज्ञा, तेव्हा अजून थोडे मोठे झाल्यावर प्रज्ञाद्वारे स्वतःचं मन स्वच्छ करायला शिका व याच प्रज्ञेचा उपयोग समाजातील अनिष्ट दूर करण्याचा पण प्रयत्न असू द्या, तरच माझी पूजा व महादेवावरचा अभिषेक संपन्न होईल, कराल नं माझी पूजा संपन्न ? तथास्तू !

तरुण भारत : १ फेब्रुवारी २०१०